# उत्तरार्ध

विजया राजाध्यक्ष

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**उत्तरार्ध**
विजया राजाध्यक्ष

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
विजया राजाध्यक्ष
२, अभंग साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ५१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २९०/-

माझी ‘कथासरित्सागर’ असलेली मैत्रीण
डॉ. मंगला सरदेशपांडे
हिला ....

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. संधिकाल | ............................. | ९ |
| २. रक्तकमळ | ............................. | ३१ |
| ३. आणखी एक परीक्षा | ............................. | ४५ |
| ४. तिघी | ............................. | ६४ |
| ५. किनारा | ............................. | ८० |
| ६. निर्वाण | ............................. | १०० |
| ७. तिसरा अंक | ............................. | ११८ |
| ८. उत्तरार्ध | ............................. | १३५ |
| ९. वळण | ............................. | १५३ |
| १०. अंत ना आरंभही... | ............................. | १६७ |
| ११. उशीर झालेला नाही | ............................. | १७९ |
| १२. आयुष्याच्या संध्याकाळी | ............................. | १९२ |
| १३. दिवे विझले | ............................. | २०५ |
| १४. पै-पैशाची गोष्ट | ............................. | २२४ |


✦✦✦

# पूर्वप्रसिद्धी

संधिकाल (मूळ शीर्षक : संधिप्रकाशाची वर्षे) : साधना, दिवाळी १९९६
रक्तकमळ : स्नेहश्री, दिवाळी १९९६
आणखी एक परीक्षा : कथाश्री, दिवाळी १९९५
तिघी : लोकसत्ता, दिवाळी १९९४
किनारा : कथाश्री, दिवाळी १९९४
निर्वाण : लोकसत्ता, दिवाळी १९९१
तिसरा अंक : पुढारी, दिवाळी १९९०
उत्तरार्थ : कथाश्री, दिवाळी १९९६
वळण : पुढारी, दिवाळी १९९४
अंत ना आरंभही : मुंबई तरुण भारत, दिवाळी १९९३
उशीर झालेला नाही : मुंबई तरुण भारत, दिवाळी १९९५
आयुष्याच्या संध्याकाळी : ऋणानुबंध, दिवाळी १९९४
दिवे विझले : साधना, दिवाळी १९९५
पै-पैशाची गोष्ट : अनुष्टुभ, दिवाळी १९९६

# संधिकाल

पलंगाच्या समोरच मोठे, ठोके पडणारे घड्याळ होते. तारुताईंना नक्की आठवत होते की, त्या घड्याळाकडे आपली नजर रोखलेली असतानाच साडेचारचा ठोका पडला. हेही आठवत होते की, खिडकीचा पडदा नीट सरकवला नसल्यामुळे उतरत्या उन्हाच्या सावल्या खोलीभर पसरल्या होत्या. एक सौम्यसा सूर्यकिरण थेट डोळ्यांत उतरला होता. दृष्टीला त्याचा स्पर्श जाणवत होता. त्या स्पर्शामुळे किंचित काळ सुरक्षित वाटले का? ताठरलेले शरीर जरा सैलावले खरे. जराशी गुंगीही आली. त्या गुंगीत एक स्वप्नही पडू लागले.....

...आणि बघता बघता संध्याकाळ झाली. केव्हा? कशी?

सूर्यकिरण केव्हाच निरोप घेऊन निघून गेला होता. भोवती रेंगाळत होता फक्त संधिप्रकाश. मनावर ताण आणणारा आणि मनातला गूढ विसावा देणाराही. तो ओळखीचा होता. अलीकडच्या काही वर्षात त्याची सोबत होती. अन्य प्रहर जणू नाहीसेच झाले होते आणि फक्त तोच उरला होता. तो गूढ संधिकाल, गर्दीच्या वाटा चुकवून एकाकी पायवाटेने अलगद पुढे जाणारा. नेमके कुठे थांबायचे आहे याबद्दलचे रहस्य स्वत:पाशीच ठेवणारा. त्याला विचारून तरी काय उपयोग? तो आपले घट्ट मिटलेले ओठ कधी उलगडणार नाही किंवा फक्त उरलासुरला प्रकाश पिण्यासाठीच उघडेल. प्रकाश कधीतरी नाहीसा होणार आहे. त्याचा निरोप घेण्यासाठी वर उचललेला एक हात डोळ्यांसमोर हलतो आहे.

तारुताईंना आठवले. आपल्याला असेच काहीतरी स्वप्न पडत होते. ते अलीकडे पुन्हापुन्हा पडते. क्वचित् स्थळे वेगळी, क्वचित संदर्भ वेगळे; पण स्वप्न तेच, निरोपासाठी वर उचललेला हात तोच, एकदा कधीतरी तो हात अच्युतन्च्या हातासारखा वाटला होता. ''तारम्....'' असे शब्दही दूर कुठून आल्यासारखे वाटले होते; पण तो स्वप्नात झालेला भासच असेल. आता अच्युतन् कुठला? आणि त्याची ती ''तारम्....'' ही हाक तरी कुठली? तो तर

केव्हाच निघून गेला. तो पुन्हा परत येणे अशक्यच. त्याची वाटही आपण पाहात नाही; पण स्वप्नात एकदा दिसला खरा. त्या वेळी अकारण हुरहूर लागली.

एरवी तो हात अनाम, ते स्वप्नही अनाम.

'माझ्या सध्याच्या - गेल्या काही वर्षांतल्या आयुष्यासारखाच?' तारुताईंच्या मनात प्रश्न भिरभिरला. त्यांनी लगेच त्या प्रश्नाला दूर ढकलले. आता त्यांना प्रश्न नको होते आणि उत्तरेही नको होती. सगळेच पूर्णत: गैरलागू झाले होते.

तारुताईंनी स्वत:चा हात वर उचलण्याचा निष्फळ प्रयत्न केला. हात तसाच, जागच्या जागी, हातच नव्हे, त्या बाजूचे सबंध शरीरच. अर्धे निर्जीव, अर्धे सजीव; पण सजीव शरीरही निर्जीवच एका अर्थाने. कारण अर्ध्या शरीराने व्यवहार कुठे करता येतात? फक्त पडून राहायचे. कोणीतरी येते आणि करून जाते.

संध्याकाळ झाली आहे. घड्याळ नीटसे दिसत नाही; पण साडेसहा तरी वाजले असावेत. शिशिर ऋतूत अंधार कितीतरी लवकर पडतो! तो अंधार पाहूनच तुळसा येईल. आधी दिवा लावील, मगच इतरांना हाक देईल. हसन, पुट्टा... कुठेकुठे जाऊन बसले असतील. तेही बेजबाबदार नाहीत; पण कंटाळतात. कंटाळत नाही ती तुळसा. वेळेवर येते आणि सर्वांकडून काम करवून घेते. आवारातच राहते. तिच्यामागे प्रपंच आहे; पण तिची वेळ चुकत नाही. आज कशी आली नाही?

पण हा प्रश्न मनात येऊन स्थिरावण्यापूर्वीच लॅच-कीने दार उघडल्याचा आवाज आला. ही तुळसाच. चांगली धिप्पाड, उंचनिंच. तीन बाळंतपणे झाली; पण अजून ताठ, सशक्त. आता पन्नाशीची तरी असेल. इथे तिला आणूनच किती वर्षे झाली. त्यावेळी जशी दिसत होती, तशीच अजून दिसते-केसांच्या रुपेरी कडा सोडून.

दिवा लागला व कानावर हाक आली, ''बाई....''

''आलीस का ग?''

''आले ना. पुट्टाला बोलावते. कोणती भाजी करायला सांगू?''

''काहीही सांग ग, जेवावंसं वाटत नाही....''

''असं कसं? मेथीची भाजी सांगते.... एक गरम भाकरी भाजून देते. तोंडाला चव येईल बघा.''